# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.१३/०५/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र.३४०/२०२३ कलम ३२४,५०४,५०६ भादवि | वडरपुरा हनुमान मंदीर जवळ अमरावती शहर | दि.१२/०५/२०२३ चे २२.३० वा<br>दा.ता.वेळ<br>दि.१५/०५/२०२३ चे ०१.४९ वा | एक महीला | सचिन हरीदास देवकर रा.वडरपुरा हनुमान मंदीर जवळ अमरावती | **हकीकत अशा प्रकारे आहे की, मी समक्ष पो.स्टे. ला येवुन रिपोर्ट देतो की. मी वरिल ठिकाणी आई, मुलगा नातु असे राहतो व मजुरीचे काम करते, माझे घरासमोर राहणारा सचिन हरीदास देवकर हा दारु पिण्याचा सवयीचा आहे दि.१२/०५/२०२३ रोजी रात्री १०.३० वा दरम्यान मी माझ्या अंगणात घरासमोर बसलेली होती माझा मुलगा झोपुन होता तेव्हा सचिन देवकर दारु पिवुन त्याचे घरासमोर बसुन दारुच्या नशेत शिवीगाळ करित होता माझा मुलगा त्याला समजावण्यासाठी गेला तर त्याने शिवीगाळ केली त्या दोघांचे वादात माझा मुलाने सचिनला धक्का दिला तर सचिन खाली पडला सचिनचा मोठा भाऊ जयराम हरिदास देवकर हा घरातुन बाहेर आला व सचिनला माझ्या मुलाने धक्का दिल्याने तो खाली पडला म्हणुन जयराम माझ्या मुलाला बोलु लागला तितक्यात सचिन देवकर घरातुन कोयता आणला तो माझ्या मुलाला कोयता मारणार तितक्यात मी भांडणामध्ये पडली तेव्हा तो कोयता माझ्या उजव्या हाताचे अंगठ्याजवळ लागला आमचे भांडण पाहुन मोहल्यातील लोक जमा झाले मला लागले असल्याने माझ्या मुलाला व मोहल्यातील संजु देवकर यांना सोबत घेवुन पोलीस स्टेशनला आले व जयराम हरिदास देवकर याने माझ्या मुलाला शिवीगाळ केली व सचिन हरिदास देवकर याने मला व माझ्या मुलासोबत भांडण करुन शिवीगाळ केली तसेच मारण्याची धमकी देवुन कोयत्याने माझे उजव्या हाताच्या अंगठ्याजवळ मारल्याने मी त्याचे विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार देत आहे हाच माझ्या जबाणि रिपोर्ट माझे सांगणे प्रमाणे बरोबर लिहला वाचुन दाखविला बरोबर आहे अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |
| २. | भातकुली अपक्र 98/23 कलम 324,323,504,506,34,भादवि | ईदीरानगर भातकुली. 0.2किमी दक्षिण | दि 12/05/2023 चे 20/00 वाते 22/30 वादरम्याण<br>दाखलतावेळ-*दि. 13.05.2023 चे 04.40 वा | **एक महीला** | 1-गजानन विश्वनाथ वाघमारे वय 40<br>2-शंकर विश्वनाथ वाघमारे वय 45<br>दोन्हीराइंदीरानगरभातकुली | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील पिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन फिर्यादी चा मुलगा वर नमुद ठिकामी धटना ता वेळी जेवन करुन फिर्यादीचे घरासमोर बसला असतांना वरील आरोपी क्र यानेफिर्यादीच्या मुलाच्या अंगावर गाडी आणण्याचा प्रयत्न केला. वरुन फिर्यादीच्या मुलाने आरोपी क्र 1 यास गाडी सरळचालव असे म्हटले वरुन आरोपीक्र 1 याणे फिर्यादीच्या मुलाला शिविगाळ केली व व त्याच वेळी आरोपीक्र 2 यानेफिर्यादीच्या मुलास पकडुन ठेवले व आरोपीक्र 1 याने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीच्या मुलाच्या डाव्याडोळयाचे वर मारुन जखमी केली व इतरठिकाणी सुध्दा मारुन जख्मी केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली फिर्यादीचे जबानीरिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल **केला.** |

इतर

| अ. क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | बडनेरा अप क्र.३३९/२०२३ कलम १३५ ( III) महा.पोलीस अधिनियम | दर्गा समोरील सार्वजनिक मैदान , अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा | दि.१२.०५.२०२३ चे २२.०० वा. ते दि.१३.०५.२०२३ चे ०४.४०वा दरम्यान दि.१३.०५.२०२३ चे ०५.०१ वा चे पुर्वी दि.१३.०५.२०२३ चे ०५.०१ वा. | सरतर्फे नितीन अशोक मगर वय-४५ वर्ष व्यवसाय ञ्नोकरी वरिष्ठ पोनि पोस्टे बडनेरा अम श | १ मजहर खॉ अफसर खॉ वय-५० वर्ष रा. अलमास नगर , जुनी वस्ती बडनेरा २) अब्दुल सत्तार अब्दुल कादर वय-६० वर्ष रा. नुर नगर जुनी वस्ती बडनेरा ३)रऊफ खॉ सरफराज खॉ वय-७० रा. अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा ४)अब्दुल सलीम अब्दुल हाफीज वय-५० वर्ष रा. चमन नगर जुनी वस्ती बडनेरा 5) अब्दुल शगीर अब्दुल मजिद वय-४५ रा अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा ६) अब्दुल रऊफ पटेल अब्दुल रफिक वय अं.४५ रा. अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की सर तर्फे फियादी नितीन अशोक मगर वय-४५ वर्ष व्यवसाय-नोकरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो स्टे बडनेरा अम श. मो.क्र.९४२०७५११००यांनी पोस्टैला लेखी फियाद दिली की मी पो स्टैला समक्ष लेखी रिपोंट देतो की आम्ही पो स्टे बडनेरा अमरावती शहर येथे दि. ११.०५.२०२३ रोजी पासुन पो.ठाणे प्रभारी पदावर सेवारत आहे. दि.०९.०५.२०२३ ते दि. २०.०५.२०२३ पावेतो ०६.०० वा. ते २२.०० वा पावेतो ची अलमास मियाँ उर्फ कमलीवाले बाबा दर्गाह ट्रस्ट र.नं.२२८एम एस बी डब्ल्यु /अमरावती /२१९/२००९ या संस्थेच्या पदाधिकारी यांना त्यांच्रा विनंती अर्जाप्रमाणे पो स्टे स्तरावरुन उर्स निमित्त कार्यक्रमाची लेखी परवानगी देण्यात आली आहे त्या परवानगी सोबत त्यांना र्शती व अटी सुध्दा सांगण्यात आल्या. दि.१२.०५.२०२३ रोजी उर्स निमीत्त दर्गा समोरील र्सावजनीक मैदान अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा येथे कव्वालीचा कार्यक्रम करीता २२.०० पर्यत कार्यक्रमास परवानगी देण्यात आली आहे आम्ही सोबत पोउपनि तायडे पोउपनी कदीरखान पो अमंलदार ९५६, १७५६,१४०२,१७५३,१६९५, असे उर्स बंदोबस्त करीता अलमास गेट जुनी वस्ती बडनेरा येथे हजर असतांना संस्थेच्या पदाधिका-यांनी कव्वालीचा कार्यक्रम दिलेल्या वेळेनंतर ही रात्री २२.३० वा चालु असल्या कारणने विनंती करुन समजावुन सांगीतले तरी सुध्दा नमुद संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी नामे १ मजहर खअफसर खन रा अलमास नगर जुनी वस् बडनेरा २ अबदुल सत्तार अब्दुल कादर वय-६० रा .नुर नगर जुनी वस्त ३ रउफ खन सरफराज ख वय७० रा. जुनी वस्ती बडनेरा ४ अब्दुल सलीमअब्दुल हाफील वय-५० रा. ।चमन नगर ५.अब्दुल शगीर अब्दुल मजीद वय-५० रा. अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा ६. अब्दुल रउफ पटेल अब्दुल रफीक वय-४५ अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा यांनी दि. १२.०५.२०२३ चे २१.३० वा पासुन कार्यक्रम सुरु करुन दि. १३.०५.२०२३ चे ०४.४० वा पर्यंत सार्वजनिक ठिकाणी लाउड स्पिकर वाजवुन कार्यक्र चालु ठेवले वर नमुद अध्यक्ष पदाधिकारी यांनी मा. पोलीस आयुक्त सा. यांचे आदेश क्र.पो.आ.अ.वि.शा/का.व.सु /१६९२/२३ रोजीचे ०४.४० वा पर्यत सार्वजनिक ठिकाणी लाउड स्पिकर वाजवुन कार्यक्रम चालु ठेवले तसेच वर नमुद अध्यक्ष व पदाधिकारी यांनी मा. पोलीस आयुक्त सा. यांचे आदेश क्र. पोआअ/विशा/कावसु/१६९२/२३ दि.१०.०५.२०२३ रोजी सदर कार्यक्रम संबधाने दि.१२.०५.२०२३ चे ००.०१ ते दि.२६.०५.२०२३ चे २४.०० वा. पावेतो लागु असलेल्या कलम ३७ (1) व 37 (3) म.पोर्काईे नुसार जारी केलेल्या आदेशला योग्य प्रसिध्दी देण्यात आली असतांना सुध्दा अशा कायदेशीर आदेशाचे उल्लंघन केले. करीता सदर आरोपी यांचे विरुध्द कलम १३५(III) महा.पोलीस अधिनियमनुसार गुन्हा दाखल होणेस माझी कायदेशीर र्फियाद आहे .अश फिर्यादीच्या लेखी फिर्यादवरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| २ | **नागपुरी गेट अप क्र.२२२/२०२३ कलम ११(१)(क)(घ)(ड)(च) प्राण्यांना क्रुरतेने वागणुक** | **हैदरपुरा कब्रस्तान जवळ समोरील नाल्याजवळ** | **दिनांक १३/०५/२३ चे ०८.०० वा** <br> **दिनांक १३/०५/२०२३ चे ०९.३१ वा** | **सरतर्फे पोउ पनि प्रणित पाटील पो.स्टे नागपुरी गेट अमरावती शहर** | **अंकीत अजाबराव मोहोड वय-३४ वर्षे, अनतोरा जिल्ह वर्धा २)शेख अन्सार शेख युनुस वय-४६ वर्षे रा.रहेमत नगर गल्ली नं.३** | **हकिकत अशा प्रकारे आहे की,मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे सापळा कार्यवाही करुन नमुद वाहणास पंचासमक्ष थांबवुन त्याचे समक्ष सदर वाहण बोलेरो पीक अप कंपनीची गाडी क्र.MH ४० BL ५५२२ ची पाहणी केली असता त्यात ४ गोवंश जनावरे कोबुन व त्यांचे हात-पाय बांधुन निर्दयतेने वाहतुक करित असतांना मिळुन आले.सदर गोवंश बाबत विचारणा केली असता उडवा उडवीची उत्तरे देवुन सदर माल हा आरोपी क्र.२ याचा असल्याचे आरोपी क्र.१ याने सागितले,वरुन नमुद आरोपीचे कृत्य कलम ११(१)(क)(घ)(ड)(च) प्राण्यांना क्रुरतेने वागणुक प्रति.अधि सहकलम ५,९, ९(अ)(ब) महा प्राणी संरक्षण अधि कायदा ८३/१७७ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा होत असल्याचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा** दाखल **केला.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रति.अधि सहकलम ५,९, ९(अ)(ब) महा प्राणी संरक्षण अधि कायदा ८३/१७७ मोटर वाहन कायदा | | | | अमरावती . | |

विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टेगाडनगर अमरावती ------------- अपक्र.६४६६/२३ कलम- ५०६,३५४ भादवी सहकलम- ८,१२ पोक्सो | अमरावती | घतावेळ दि.१३/५/२३ चे ०१.१५ वा -------------- दाखल तावेव १३/५/२०२३ चे ०४.०१वा | ------------- | एक मोबाईल क्र. धारक | हकीकत असा प्रकारे आहे की, नमुद घतावेळ ठिकानी फिर्यादी रोड वरुन रुम मध्ये जात असताना आरोपी १ इसम वय- अंदाजे ४० ते४५ दरम्यान स्वताच्या दुचाकी सह उभा होता त्याने फिला आवाज दिला व म्हणाला की, एवढ्या रात्री का फिरत आहे तेव्हा फिने आरोपीला म्हटले की, काका मला मेडीकल चे काम आहे म्हणुन मी बाहेर होती तेव्हा आरोपीले फि ला म्हटले की, तु तुझ्या मित्रा सोबत रात्रीला फिरते तुझा रिपोर्ट पोलिसात देइल तुझ्या सोबत फिजीकल रिलेशन करु दे मी तुला पैसे देईल तुझ्या मैत्रीनीला रुम च्या बाहेर काढ आपण दोघे रुम मध्ये राहु असे म्हणुन आरोपीने जबरदस्तीने फिचा मोक्र.घेतला व फिच्या मोबाईल वर मिसकॉल मारला होता व तेव्हा आरोपीने फिचा डावा हात पकडला फि.ने हाताला झडका मारुन रुम मध्ये धावत गेली अशा फिच्या बयाना वरुन डिओ सा.याच्या आदेशाने सरचा गुन्हा दाखल केला. |

अकस्मात मृत्यु :– (पान क्र ०१)

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग. नं. व दा.ता.वेळ. | धटनास्थळ | मृतकाचे नाव | फिर्यादी | मरनाचे कारण | अकस्मात मृत्यचे विवरण | चौकशी अधीकारी नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन सिटी कोतवाली मर्ग नं १६/२०२३ कलम १७४ जाफौ दा ता वेळ | ईर्विन दवाखाना आवारामध्ये वॉर्ड नं १६ जवळ | वसंत गणपतराव चिखलकर वय ६५ वर्ष रा नारायण नगर पो स्टे खोलापुरी गेट | सरतर्फे संजय ब न ६५४ पो स्टे सिटी कोतवाली अम शहर | डोक्याला मार लागल्यामुळे | हकीकत अशा प्रकारे आहे की मेमो क्र १०८८७ मधील मृतक नामे वसंत गणपतराव चिखलकर वय ६५ वर्ष रा नारायण नगर पो स्टे खोलापुरी गेट हा ईर्विन दवाखाना आवारामध्ये पडल्यामुळे डोक्याला मार लागल्यामुळे जख्मी झाल्याने उपचारा करीता ईर्विन दवाखाना वॉर्ड नं १६ मध्ये भरती | GPSI संजय देशमुख ब न पो स्टे सिटी कोतवाली अम शहर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **दि १३/०५/२०२३ चे १४.३२ वा** | **अमरावती** | | | | **असता उपचारा दरम्यान आज दि १३/०५/२०२३ रोजी मरण पावला सदर प्रेत पि एम करीता ईर्विन मर्च्युरी करीता ठेवण्यात आले असा मरणाचा मेमो ईर्विण दवाखाना येथुन प्राप्त झाल्यावरुन सदरचा मर्ग दाखल केला.** | |

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | राजापेठ मर्ग क्र ४५/२३ कलम १७४ जाफौ | परिमंडळ ३ 2 अमरावती शहर | **दि. 12.05.2023 रोजीचे 22.10 वा. पुर्वी दि. 13.05.2023 रोजीचे 02.24 वा.** | **मोनु संतलाल प्रजापती वय 30 वर्ष रा देशपांडे प्लॉट रंगोली हॉटेल मागे अमरावती** | **सपोउपनि/883 केश मालवे पो स्टे राजापेठ अमरावती शहर** | **रेल्वेने कटुन आत्महत्या** | दि. 12.05.2023 रोजी आम्ही पोहवा/880 निलेश वानखडे सोबत पोशि/1530 यांची पो स्टे राजापेठ येथे 21.00 वा ते 08.00 वा पावेतो तपास मदत डयुटी असता दि 12.05.2023 रोजी 22.10 वा. उप स्टेशन प्रबंधक मध्य रेल्वे अमरावतीच्या कर्मचाऱ्यानी मेमो क्र 13 स्टेडाला आणुन दाखल केला गाडी क्र 12120 इंटरसिटी गाडी समोर एक अनोळखी इसम आल्याने किमी नं 669अे/13 वर त्याचा रेल्वेने कटुन मृत्यु झाला वरुन दि 12.05.2023 रात्री डिओ सपोउपनि/883 केशव मालवे सोबत नापोशि/105 असे पो स्टे चे मोबाईलने घटनास्थळी जावुन पाहणी केली मृतक हा त्याच परिसरातील राहणारा मोनु संतलाल प्रजापती वय 30 वर्ष रा देशपांडे प्लॉट नवाथे अमरावती असे असल्याचे त्याचे नातेवाईक सोहन शेतलाल प्रजापती वय 34 वर्ष भाऊ यांनी सांगितले वरुन घटनास्थळी पाहणी करुन प्रेत इर्विन हॉस्पीटल येथे तपासुन शवागृहात ठेवण्यात आले. प्रेताचे पीएम करणे असल्याने प्रेत मर्च्युरी मध्ये ठेवण्यात आले असुन डि ओ आदेशाने कलम 174 जाफौ प्रमाणे मर्ग दाखल केला | पोहवा/880 निलेश वानखडे पो स्टे राजापेठ अमरावती शहर |